**दिनांक : २१ - ५ - २३**

**विषय : पत्रकार नगर च्या पुनर्निर्माण संबंधी संस्थे चे सभासद आणि कुटुंबीयांचा मेळावा.**

संस्थेच्या पुनर्निर्माण प्रकल्पाच्या २८ - ५ - २३ ला आयोजित विशेष सर्व साधारण सभेत होणाऱ्या विषया ची सविस्तर माहिती आणि त्याची पार्श्वभूमी सर्व सभासद आणि त्यांच्या कुटुंबियांना सांगण्या साठी दिनांक २१ - ५ - २३ रोजी सकाळी १० वाजता संस्थेच्या मधुकर जोशी सभागृहात एक मेळावा घेण्यात आला. श्री विजय सावंत मेळाव्याच्या अध्यक्ष स्थानी होते. मेळाव्याला ९७ सभासद् आणि त्याचे कुटुंबीय उपस्थित होते.

उपस्थितांचे स्वागत करून अध्यक्षांनी संस्थे चे सभासद श्री यशवंत केंजळे यांचा मुलगा अक्षय आणि श्री मनोज शिवापुरकर यांचा मुलगा कुणाल, ज्यांनी नुकतेच अमेरिकेत एम. एस. ची डिग्री पूर्ण केली, त्यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन केले. तसेच संस्थे चे सभासद श्री सुरेशचंद्र वारघडे आणि यशोदा वाकणकर यांच्या पुस्तकांना माना चे पुरस्कार मिळाल्या बद्दल त्यांचे ही अभिनंदन करण्यात आले. आपले अध्यक्ष श्री विजय सावंत यांना ही "नू. म. वी. रत्न" संम्मानाने नुकतेच सम्मानित करण्यात आले आहे. त्या करिता संस्थे तर्फे सचिव श्री विनायक पटवर्धन यांनी श्री सावंत यांचे अभिनंदन केले.

ह्या नंतर अध्यक्षांनी सभे ची सूत्र पंच समिती सदस्य श्री प्रदीप नेवाळकर यांच्या कडे दिली.

आपल्या निवेदनात श्री नेवाळकर यांनी सभे ला आत्ता पर्यंत पुनर्निर्माण संबंधी झालेल्या सर्व कामांची थोडक्यात माहिती दिली आणि २८ - ५ - २३ ला आयोजित विशेष सर्व साधारण सभेत जे मुद्दे सभासदांच्या मंजुरी साठी घेण्यात येणार आहेत ते एक- एक करून मांडले. हे मुद्दे खालील प्रमाणे होते --

१. पुनर्निर्माण योजनेत प्रत्येक सभासदाला वाढीव जागा त्याच्या सध्याच्या जागेच्या टक्केवारी अनुसार मिळेल. ही वाढीव जागा सध्याच्या कॉर्पोरेशन नकाशात दाखवलेल्या जागेच्या १०० टक्के अधिक किंव्हा त्याहून जास्त ही असेल. (आपण शॉर्ट लिस्ट केलेल्या तीन बिल्डर्स ने क्रमशः १००, १०६ आणि ११३ टक्के वाढीव जागा देण्याच्या ऑफर्स दिल्या आहेत). नेवाळकरांने असे ही सांगितले की आपल्या कडे ढोबळ मानाने असणाऱ्या ५ प्रकार च्या फ्लॅट्स / डुप्लेक्स ची जागा पुनर्निर्माण झाल्यावर
* १४५९ ते १५२५
* १७४८ ते १८२१
* २१८५ ते २२६२
* २४९६ ते २५६५ आणि
* डूप्लेक्स १९०४ sft असू शकेलं.

२. डूप्लेक्स प्रकार ची ६ x २ घरं जमिनीवरच असतील आणि Open to Sky.

3. फायनल झालेल्या विकासकाकडून रू. २० लाख प्रत्येकी (१०२ सभासदांना) Betterment Charges म्हणून घेण्यात येतील.

४. कॉर्पस फंड म्हणून प्रत्येकी रु. ५ लाख सोसायटी फंड म्हणून घेण्यात येतील.

५. विकासकाकडून सोसायटी रू. ५० कोटी ची बेंक गारेंटी घेईल जी सभासदांना प्रोजेक्ट काळात (३ वर्ष) देण्यात येणाऱ्या भाड्या च्या तसेच जर कुठल्याही कारणाने विकसक प्रोजेक्ट करू शकला नाही तर त्याच्या सेक्युरिटी साठी असेल.

६. विकसका कडून प्रत्येक सभासदाला रू. ४५ प्रती sft दर महिन्या च्या दराने (आत्ता असलेल्या घराच्या जागेच्या मापा प्रमाणे) तीन वर्षांसाठी घर भाडे घेण्यात येईल. हे भाडे दर वर्षी ५ टक्के दराने वाढविण्यात येईल. जर प्रोजेक्ट पूर्ण होण्यास ३ वर्षां हून अधिक काळ लागला तर त्या काळा साठी ही घर भाडे घेण्यात येईल. तसेच बँक गेरेंटी ची सेक्युरीटी असेलच.

७. सभासद प्रोजेक्ट काळात दुसऱ्या जागेत रहायला जातील तिथे त्यांना घरा साठी काही रक्कम डिपॉजिट म्हणून द्यावी लागेल ह्या साठी प्रत्येक सभासदाला विकसक रू. २५० प्रती sft दरा ने Refundable Deposit देईल. ही रक्कम नवीन घराचे possession घेतांना विकसकाला परत करायची आहे.

८. सध्याचे घर प्रोजेक्ट सुरू होताना सोडावे लागणार तसेच प्रोजेक्ट पूर्ण झाल्यावर परत नवीन घरात येताना सभासदांना त्यांचे सामान ट्रान्सपोर्ट करायचा खर्च म्हणून प्रत्तेक सभासदास विकसक रू. ५००००/- देईल.

९. Community Space म्हणून २०००० sft जागा विकसक बांधून देईल. ह्या जागे चा उपयोग सोसायटी चा Community Hall, सोसायटी ऑफिस तसेच भाड्याची दुकानं, ऑफिसेस, जिम सारख्या गोष्टीनं साठी करण्यात येईल ज्यामुळे सोसायटी ला उत्पंनाचे साधन मिळू शकेल.

वर दिलेल्या पॉइंट्स वर येत्या २८ तारखेच्या विशेष सर्व साधारण सभेत मंजुरी घेण्याचे पंच समिती चे प्रयत्न आहेत.

ह्याच्या व्यतरिक्त विकसक ज्या इतर सर्व आधुनिक Amenities and Facilities देणार आहेत त्यांचा ही उल्लेख श्री नेवाळकरांनी केला.

ह्या नंतर सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना श्री नेवाळकर आणि श्री पटवर्धन यांनी उत्तरं दिली. काही सभासदांनी काही उपयोगी सूचनाही केल्या ज्यांची नोंद पंच समिती ने घेतली आहे. चर्चेत श्री भूषण तळवलकर, श्री अरविंद करंदीकर, श्रीमती निर्मला सावदेकर, श्री यशवंत केंजळे, श्री राजीव साबडे, श्री मोरेश्वर जोशी, श्री दिलीप पटवर्धन, श्री चैतन्य डुंबरे, श्री वसंत जोगदेव आदि सभासदांनी भाग घेतला.

श्री यशवंत केंजळे यांनी त्यांच्या मुलाच्या यशात पत्रकार नगर इथले वातावरण आणि त्याला इथे मिळालेल्या संस्कारांचा मोठा वाटा असल्याचे सांगितले आणि सर्व सभासदांना त्या बद्दल धन्यवाद दिले.

शेवटी सचिव श्री पटवर्धन यांनी २८ तारखेच्या विशेष सर्वसाधारण सभेत सभासदांनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे असे आव्हाहन करून तसेच मेळाव्यात उपस्थिती साठी सगळ्यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समितीच्या वतीने**